# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर
Office of the Collector and District Magistrate, Mumbai City
ओल्ड कस्टम हाउस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई 400 001
Old Custom House, Shahid Bhagatsing Marg, Mumbai 400 001
Fax : 22664232 Tel. 22665233 Email :collector _ mumbaicity@maharashtra.gov.in


क्रमांक – रवका/टे-3/केंशामाअअ-05/शामअ/2007
दिनांक – 90 जानेवारी, 2007

**विषय** – केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005

**संदर्भ** – 1. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.केंमाअ-2005/ प्र.क्र.190/05/5, दिनांक 18/6/2005

2. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.केंमाअ-2005/ प्र.क्र.190/05/5, दिनांक 6/8/2005

3. जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे आदेश क्र.रवका/टे-3/ केंशामाअअ-05/सशामअ/05, दिनांक 11/10/2005

**आ दे श**

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 5 (1) नुसार जिल्हाधिकारी मुंबई शहर कार्यालयासाठी संदर्भ क्र.3 अन्वये ''सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी '' ''शासकीय माहिती अधिकारी '' आणि ''अपिलीय प्राधिकारी '' पदनिर्देशित करण्यात आले आहेत.

2. उपरोक्त अधिनियमातील कलम 5 (1 ) अन्वये जनतेला माहिती देण्याकरिता जिल्हाधिकारी मुंबई शहर कार्यालयाकरिता संदर्भातील क्र. 3 नुसार अ.क्र. 11 वर श्री. जे.एन.काझी, तहसिलदार, कुलाबा विभाग, मुंबई शहर यांना मुंबई शहर जिल्ह्यातील कुलाबा विभागातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे (कुलाबा,फोर्ट, भुलेश्वर, मांडवी, गिरगाव, भायखळा, मलबार/खंबाळा हिल, माझगांव, परेल, शिवडी, ताडदेव आणि प्रिन्सेस डॉक महसूल विभागातील सर्व जमिनी) आणि त्यांच्याकडे सोपविलेल्या इतर विषयाची माहिती जनतेला उपलब्ध करुन देण्याकरिता ''शासकीय माहिती अधिकारी'' म्हणून पद निर्देशित केलेले होते.

3. ज्याअर्थी श्री. जे. एन. काझी हे सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच श्री. आर. व्ही. सोनावणे यांनी तहसिलदार, कुलाबा विभाग, मुंबई शहर या पदाचा कार्यभार दि.1/7/2006 पासून स्विकारला आहे. त्याअर्थी श्री. आर. व्ही. सोनावणे, तहसिलदार, कुलाबा विभाग, मुंबई शहर, वि. वि. इमारत, 4 था माळा, ओल्ड कस्टम हाउस आवार, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – 1 दु.क्र.22701735 यांना मुंबई शहर जिल्ह्यातील कुलाबा विभागातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे (कुलाबा,फोर्ट, भुलेश्वर, मांडवी, गिरगाव, भायखळा, मलबार/खंबाळा हिल, माझगांव, परेल, शिवडी, ताडदेव आणि प्रिन्सेस डॉक महसूल विभागातील सर्व जमिनी) आणि त्यांच्यावर सोपविलेल्या इतर विषयाची माहिती जनतेला उपलब्ध करुन देण्याकरिता या आदेशान्वये उपरोक्त अधिनियमातील कलम 5 (1 ) अन्वये ''शासकीय माहिती अधिकारी'' म्हणून दि. 1/7/2006 पासून पद निर्देशित करण्यात येत आहे.

4. श्री. जे. एन. काझी, तहसिलदार, कुलाबा विभाग, मुंबई शहर यांना दिनांक 11/10/2005 अन्वये शासकीय माहिती अधिकारी म्हणून पद निर्देशित केलेले आदेश दिनांक 1/7/2006 पासून निरसित करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी मुंबई शहर

प्रति,

1. श्री.आर.व्ही.सोनावणे, तहसिलदार, कुलाबा विभाग, मुंबई शहर
2. उप जिल्हाधिकारी (अति./निष्का.) कुलाबा विभाग, मुंबई शहर
3. प्रमुख लिपिक व प्रमुख लेखापाल, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर
4. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, एन.आय.सी.,मुंबई शहर
5. श्री.जे.एन.काझी, तत्कालिन तहसिलदार, कुलाबा विभाग, मुंबई शहर

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

6. मा.प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई – 400 032
7. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई – 400 614
8. मा.सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई – 400 032